# प्रेसनोट

नाशिक,
दि.१५/२/२०२२

**आलोसे क्र.१) योगेश पंडीत चौधरी, भुकरमापक, आलोसे क्र.२) योगेश विजय कातकाडे, छाननी लिपीक, दोन्ही नमेणुक भुमी अभिलेख कार्यालय, नाशिक यांना ५०,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याने त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये कारवाई केलेबाबत...**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | नाशिक |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे गु.र.नं. ४०/२०२१ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | १) योगेश पंडीत चौधरी, वय ४३ वर्ष, भुकरमापक,<br>२) योगेश विजय कातकाडे, वय ३३, छाननी लिपीक,<br>दोन्ही नमेणुक भुमी अभिलेख कार्यालय, नाशिक, |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | **५०,०००/— रूपये लाचेची मागणी** |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ००/— रूपये |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यातील तक्रारदार यांचे शेतजमीनीची मोजणी करून देण्याच्या मोबदल्यात **आलोसे क्र.१)** योगेश पंडीत चौधरी, भुकरमापक, भुमी अभिलेख कार्यालय, नाशिक व **आलोसे क्र.२)** योगेश विजय कातकाडे, छाननी लिपीक, भुमी अभिलेख कार्यालय, नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे ८०,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने सापळापुर्व पडताळणी केली असता तक्रारदार यांचे शेतजमीनीची मोजणी करून देण्याच्या मोबदल्यात **आलोसे क्र.१)** योगेश पंडीत चौधरी, भुकरमापक, भुमी अभिलेख कार्यालय, नाशिक व **आलोसे क्र.२)** योगेश विजय कातकाडे, छाननी लिपीक, भुमी अभिलेख कार्यालय, नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे पंचाच्या समक्ष दि. २२/१०/२०२१रोजी भुमी अभिलेख कार्यालय, जुने सीबीएस जवळ, नाशिक येथे ८०,०००/— रुपये लाचेची मागणी केली व तडजोडीअंती **५०,०००/— रूपये लाचेची मागणी** करून ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे गु.र.नं. ४०/२०२१ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि. १४/०२/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in
ई— मेल :— spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :— acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :— १०६४
दुरध्वनी क्रमांक :— ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲप क्र :— ९९३०९९७७००

(सतिश भामरे)
वाचक पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक.